# मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (४१५७११)

**रूखी विभाग**

ता. दापोली, जि. रत्नागिरी.

जा.क्र.मसके रूवि – प्रअ ०८/५८६/२०२४

दिनांक :– १६/०२/२०२४

20 FEB 2024

## जाहिर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली अंतर्गत रूखी विभाग येथे प्रक्षेत्रावरील कामे पूर्ण करणेसाठी कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक **दिनांक :–०१/०४/२०२४ ते दिनांक :– २८/०२/२०२५** या कालावधीसाठी खालील प्रमाणे नमुद केलेली कामे करावयाची आहेत. तरी इच्छूक अर्जदारांनी त्यांची खालील शैक्षणिक अर्हता, संगणकीय कामकाजाचे अनुभव, इतर शैक्षणिक अर्हता आणि नमुद केलेल्या कामांचे स्वरूप लक्षांत घेऊन आपले अर्ज या कार्यालयास **दिनांक :–१४/०३/२०२४** पर्यत मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांचे नावे बंद लखोटयातून बंद करून हातबटवडा/टपालाने पाठवावीत. **''लखोटयावर कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक पदासाठी अर्ज''** असा स्पष्ट उल्लेख असावा.

### कामाचे स्वरूप

| अ.क्र | कामाचा तपशिल |
|---|---|
| १. | प्रक्षेत्रावरील आंवा, काजू, नारळ ,रवर,फणस , कोकम यांसारख्या फळ वागांची मजूरांकडून साफसफाई करून घेणचे नियोजन करणे . |
| २. | रोपवाटीकेत कलमे रोपे निर्मिती व संगोपन करणेचे तसेच विक्रीचे नियोजन करणे |
| ३. | प्रक्षेत्रावरील हैगामी पीकांची लागवड करणे व संगोपन करणे . |
| ४. | प्रक्षेत्रावरील आंवा, काजू, नारळ ,रवर,फणस , कोकम यांसारख्या फळांच्या काढणीचे व विक्रीचे नियोयन करणे . |
| ५. | मजूरांची हजेरी घेणे व त्यांच्या दैनंदिन कामाचे नियोजन करणे |
| ६. | प्रशासकिय कार्यालयामधील कामांत मदत करणे |
| ७. | वरीष्ठांनी वेळोवेळी सुचीत केलेली कामे करणे . |

**कंत्राटी प्रक्षेत्र सहाय्यक पदासाठी आवश्यक अर्हता :–**

- उमेदवार हा कृषि पदविका किंवा कृषि पदवी (पशु विज्ञान शास्त्र/अन्नशास्त्र कृषि तंत्रज्ञान/कृषि अभि/मृद विज्ञान,मत्स्य विज्ञान/कृषि जैव तंत्रज्ञान कृषि व्यवस्थापन) धारक असावा.
- MS-CIT संगणकीय हाताळणी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- विद्यापीठ प्रक्षेत्रावरील व कार्यालयीन कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

ठिकाण :– रूखी

दिनांक :–

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली, जि. रत्नागिरी

प्रत, माहिती व प्रसिध्दीसाठी.....

१. सुचना फलक, संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.
२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली.

## उपरोक्त पद भरण्यासाठी नियम व अटी खालील प्रमाणे आहेत

- उपरोक्त पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांची वयोमर्यादा ही खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी १८ ते ३८ वर्षे आणि मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ४३ वर्षे अशी राहिल
- सदर कामे सन २०२४ २५ या कालावधीकरीता राहिल. प्रक्षेत्रावरील/कार्यालयीन कामकाजाचे स्वरुप पाहून सदर कामे चालू ठेवण्यात येतील अथवा कोणतेही कारण न देता केव्हाही समाप्त केला जाईल.
- सदरची कंत्राटी नियुक्ती कामाचा दर्जा आणि अचुकता इत्यादी बाबी समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहिल. असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सदरची कंत्राटी नियुक्ती रद्द करण्यात येईल.
- प्रक्षेत्र कार्यालयात काम करतेवेळी काही अपघात/इजा झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही आणि कोणतेही विमा कवच व प्रतिपुर्ती असणार नाही.
- संबंधित उमेदवाराला कंत्राटी नियुक्ती संपण्यापूर्वी सदर कंत्राटी नियुक्ती रद्द करावयाची असल्यास त्याने तशी १ महिना आगाऊ सूचना देणे आवश्यक आहे. जर तशी आगाऊ सूचना न दिल्यास संबंधितांकडून एक महिन्याचा मेहनताना भरणे आवश्यक आहे आणि अशा व्यक्तीची कंत्राटी नियुक्ती भविष्यात घेतला जाणार नाही.
- सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४४३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या कंत्राटी नियुक्ती कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायमस्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.
- कंत्राटी नियुक्ती पध्दतीच्या अटी व शर्ती मान्य असल्यास त्याप्रमाणे हमीपत्र रुपये १००/— किंमतीच्या स्टॅम्पपेपरवर लिहून देऊन सादर करावे.
- कामाची आदायगी महिन्यातून एक वेळी करणेत येईल. त्यासाठी केलेल्या कामाचे बील सादर करावे लागेल. सदर रक्कम बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
- वरीलप्रमाणे काम करणेचे प्रति महा दर नमूद करावे.
- अर्धवट काम सोडल्यास किंवा काम अपूर्ण असल्यास बीलांची आदायगी होणार नाही व आपले नाव पुढील कामाच्यावेळी ग्राहय धरले जाणार नाही.
- वरीलप्रमाणे नमुद केलेली सर्व कामे माहे मे २०२३ ते फेब्रुवारी २०२४ पर्यंत या कालावधीत कार्यालयीन वेळेत करावयाचे आहेत.
- याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांनी राखून ठेवलेले आहेत.
- दैनंदिन कामाचे मोजमाप करण्यात येईल. पूर्ण झालेल्या कामांचाच मोबदला आदायगीसाठी ग्राहय धरण्यात येईल.
- सदरचे कंत्राटी काम करत असताना प्रक्षेत्र आणि कार्यालय दोन्ही ठिकाणचे कार्यालयीन शिष्टाचार पाळणे बंधनकारक आहे.
- उपरोक्त कंत्राटी पदाची मुलाखती घेवून नियुक्ती देण्यात येणार असून मुलाखतीची तारीख आपणांस कळविण्यात येईल.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली, जि. रत्नागिरी

ठिकाण :— वाकवली
दिनांक :—